# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट ४२३-२०२४** **दिनांक- ११/११/२०२४**

## “ पिडीत महीलेशी ओळख्र करुन मैत्रीचे संबध बनवून लग्नाचे आमिष दाखवून लैगिंक अत्याचार करणाऱ्या आरोपीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून अटक.”

**----///----**

यातील २१ वर्षीय पिडीत महीले सोबत दिनांक ०८.०१.२०२२ ते ३०.१०.२०२४ रोजी पावेतो आरोपी नामे आरोपी हफीजुल्लाह आजिजुल्लाह खान याने ओळख करुन मैत्री केली. त्यानंतर तिस लग्नाचे आमिष देवुन तिचे मनाविरुध्द लैगिंक अत्याचार केला. पिडीत महीने शारीरीक संबध ठेवण्यास नकार दिल्याने तिस शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली त्यानंतर नमुद आरोपी याने पिडीत महीलेचे नावाचे बनावट इंस्टाग्राम आयडी बनवुन त्यावर पिडीत महीलेचे खाजगी व अर्धनग्न अवस्थेतील फोटो/व्हिडीओ प्रसारीत करुन पिडीतेची बदनामी केली वगैरे मजकुरीचे फिर्यादीवरुन विरार पो.स्टे. गुनोक्र. ७७२/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ११५(२), ३५१(२), ३५२, ३५६(२),७९,६९ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० चे कलम ६७(अ) प्रमाणे दिनांक ०६.११.२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास विरार पोलीस स्टेशन हे करीत होते. सदर गुन्हा दाखल झालेपासुन स्थानिक पोलीस त्याचा शोध घेत होते परंतु तो वेळोवेळी आपला ठावठिकाणा बदलुन वावरत होता त्यामुळे तो मिळुन येत नव्हता.

सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने पोहवा/हनुमंत सुरेश सुर्यवंशी यांनी आरोपीची तांत्रीक विश्लेषनावरुन माहीती घेतली असता सदर गुन्हयातील आरोपी त्याचे वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलत होता. तदनंतर केलेल्या तांत्रीक विष्लेषन व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीचे आधारे नमुद आरोपी नामे हफीजुल्लाह आजिजुल्लाह खान वय-२३ वर्षे रा.आरटीओ ऑफीस जवळ, चंदननगर विरार पुर्व हा आरटीओ ऑफीस जवळ, चंदननगर, विरार पुर्व येथे येणार असल्याची माहीती मिळाल्याने पोहवा/राजाराम मधुकर काळे, संतोष बापु मदने, हनुमंत सुरेश सुर्यवंशी यांनी सदर ठिकाणी साफळा लावुन त्यास दिनांक ०८.११.२०२४ रोजी १२.३० वाजता शिताफीने ताब्यात घेवुन पुढील कारवाई करणेकामी विरार पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.निरी. राहुल राख, पोनि धनंजय पोरे, सपोनि/दत्तात्रय सरक, नितीन बेन्द्रे, पोउपनिरी/हितेंद्र विचारे, सहा.पोउपनिरी./श्रीमंत जेधे, मनोहर तावरे, पोहवा/हनुमंत सुर्यवंशी, राजाराम काळे, संतोष मदने, गोविंद केद्रे, सतिष जगताप, राजविर संधु, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि. अखिल सुतार, साकेत माघाडे, नितीन राठोड, अंगद मुळे, सफौ/संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.